**अपंग व्यक्ति अधिनियम (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने अपंगाच्या पदनिश्चितीची प्रसिध्द केलेली यादी विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील पदांवर अपंगांसाठी सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक : मलोआ-१०११/१२५१/१०प्र.क्र. ५/२०११/आठ,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- १३ जानेवारी, २०११.**

**संदर्भ :** १) सा.प्र.वि./का.क्र.१९-अ यांचे पत्र क्र.संकीर्ण-१०१०/ प्र.क्र.१४६/१९-अ, दि.७.१०.२०१०.
२) सा.न्या.व वि.स.विभागाचे अ.शा.पत्र क्र.न्यायाप्र-२००९/प्र.क्र.५/ सुधार-३, दि.१५.९.२०१०
३) सा.न्या. व वि.स.विभागाचा शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२००९/ प्र.क्र.५/सुधार-३, दि.३.८.२०१०

**प्रस्तावना :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार केंद्र शासनाने त्यांच्या अखत्यारीतील विविध आस्थापनांवरील अपंगांसाठीची पदे निश्चित करुन त्यांची यादी प्रसिध्द केली आहे. सदर यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारीतील शासकीय व निमशासकीय आस्थापनांवरील जी पदे समान आहेत ती पदे मंत्रालयीन विभागांनी अपंगांसाठी निश्चित करावी व तसे आदेश निर्गमित करुन त्यानुसार अपंगांची पदे भरण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भाधिन अ. क्र. ३ येथील दि. ३.८.२०१० च्या शासन निर्णयान्वये दिल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवरील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

या संदर्भात या विभागाचा यापूर्वीचा शासन निर्णय क्र.मलोआ-१००४/प्र.क्र.४०/ २००४/आठ, दि.७.७.२००८ अधिक्रमित करण्यात येत असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या

आस्थापनेवरील गट 'अ', 'ब', 'क' व 'ड' च्या विविध संवर्गातील पदे सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे किमान ४०% अपंगत्वाचे प्रमाण असलेल्या अपंगांसाठी सुनिश्चित करण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२००९/प्र.क्र.५/सुधार-३, दि.३.८.२०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०११०११३१८५७२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

१३/०१/११

**(श्री.प्र.पाटील)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई, /महाराष्ट्र-२, नागपूर.
महालेखापाल -१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई, / महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रा-(पूर्व), मुंबई,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (आस्थापना शाखा)
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती / सा.प्र.वि./कार्यासन आठ संग्रहार्थ

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मलोआ- १०११/ १२५१/ १०/ प्र.क्र.५/ २०११/आठ, दि.१३.१.२०११ सोबतचे परिशिष्ट.

## शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तिंकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवरील निश्चित केलेली सुयोग्य पदे

| अ. क्र. | पदनाम | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | सचिव | मंत्रालयीन सह सचिव / उप सचिव संवर्गासाठी निश्चित केल्यानुसार. | एकाकी पद (गट - अ) |
| २ | उप सचिव | मंत्रालयीन उप सचिव संवर्गासाठी निश्चित केल्यानुसार. | पदोन्नतीचे पद (गट-अ) |
| ३ | अवर सचिव | मंत्रालयीन अवर सचिव संवर्गासाठी निश्चित केल्यानुसार. | पदोन्नतीचे पद (गट-अ) |
| ४ | अध्यक्षांचे स्वीय सहायक | **OL/ BL/ OA/ B/LV** | एकाकी पद |
| ५ | विधी अधिकारी | - | एकाकी प्रतिनियुक्तीचे पद |
| ६ | लेखाधिकारी | - | एकाकी प्रतिनियुक्तीचे पद |
| ७ | सांख्यिकी अधिकारी | - | एकाकी प्रतिनियुक्तीचे पद |
| ८ | अधिक्षक | **OL/OA/BL/ OAL/B/LV/ HH** | - |
| ९ | लघुलेखक (उच्चश्रेणी) / (निम्नश्रेणी) | **OL/OA/BL/B/LV** | - |
| १० | विधी सहायक | - | एकाकी प्रतिनियुक्तीचे पद |
| ११ | सहायक | मंत्रालयीन सहायक संवर्गासाठी निश्चित केल्यानुसार. | - |
| १२ | सांख्यिकी सहायक | **OL/BL/B/ LV/HH** | एकाकी पद |
| १३ | सिस्टीम ॲनालिस्ट | **OA/OL/BL/ HH/B/LV** | एकाकी पद |
| १४ | प्रोग्रॅमर | **OA/OL/BL/HH/B/ LV** | - |
| १५ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | **OL/BL/LV/HH** | - |
| १६ | ग्रंथपाल | **OA/OL/ OAL/BL/ HH** | एकाकी पद |
| १७ | लिपिक- टंकलेखक | मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी निश्चित केल्यानुसार. | - |
| १८ | वाहन चालक | - | केंद्र शासनाच्या यादीमध्ये मोटारकार चालकाच्या पदाचा समावेश नाही. त्यामुळे मोटारगाडी चालकाच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता हे पद आरक्षणातून वगळण्यात आले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | चोपदार | शिपाई या पदासाठी निश्चित केल्यानुसार | एकाकी पद |
| २० | नाईक | | - |
| २१ | शिपाई | **OL/HH/LV/B** | - |
| २२ | हमाल | **OL/HH/LV/B** | - |
| २३ | स्वच्छक | **OL/HH/LV** | एकाकी पद |

वरील तक्त्यात अपंगत्वाच्या प्रकारासाठी इंग्रजी भाषेत वापरण्यात आलेली ॲब्रेविएशन्स खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| HH - Hearing Handicap | OA- One Arm |
| BL - Both Leg | OL - One Leg |
| B - Blind | OAL - One Arm and One Leg |
| LV - Low Vision | |